# K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR
## ASSESSMENT – V (2022-23)

**GRADE: III** **MARKS: 40**
**SUB: MARATHI** **TIME: 2 Hrs**

**प्रश्न १. खालील पठित कविता वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(६ गुण)**

| | |
|---|---|
| आनंदात असो वा दुःखात आपण,<br>आईला कसे बरे कळते सर्वांचेच मन ||1||<br>घेते सर्वांची काळजी नेहमी,<br>शांत, हसरी नेहमी संयमी ॥2॥<br>करता चूक मुलांनी धरते ती कान,<br>मुलांच्या प्रगतीचा तिला असतो अभिमान ||3|| | उत्तम संस्कार करते मुलांवरती,<br>साऱ्या घराची जबाबदारी तिच्याचवरती ॥4॥<br>आजारी असली तरी घेत नाही विश्रांती,<br>आई म्हणजे देवाची प्रतिकृती ॥5॥<br>एकाच वेळी देव असू शकत नाही सगळ्यांजवळ,<br>म्हणूनच त्याने पाठविली आई पृथ्वीवर || 5 || |

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. आईला कसे बरे कळते सर्वांचेच ------------.
२. ----------- असली तरी घेत नाही विश्रांती.
३. मुलांच्या ------------ तिला असतो अभिमान.

**आ) खालील वाक्य चूक की बरोबर ते लिहा.**

१. आई मुलांवरती उत्तम संस्कार करते.
२. आईने देवाला पाठविले आहे.
३. एकाच वेळी देव सगळ्यांजवळ असू शकत नाही.

**प्रश्न २. खालील शब्दांचे अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.** **(४ गुण)**

१. यातना –
२. श्लोक –

**प्रश्न ३. खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.** **(३ गुण)**

१. घराचा आधार कोण असते?
२. पंडित नेहरूंनी देशाला कोणता मंत्र दिला?
३. शिवाजी महाराजांनी कोणाला गुरूस्थानी मानले?

**प्रश्न ४. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२ गुण)**

१. बलोपासना म्हणजे काय?
२. पंडित नेहरूंना कोणते फूल आवडत असे?

**प्रश्न ५. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **(४ गुण)**

१. आईला कशाचा अभिमान वाटतो?
२. पंडित नेहरूंचा वाढदिवस बालदिन म्हणून का साजरा केला जातो?

**प्रश्न ६. खालील अपठित उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(६ गुण)**

आळशी माणूस हा सतत आरामाची अपेक्षा करत असतो. तर खरा काम करणारा माणूस'आराम हराम आहे' असे मानतो. रात्रीची पाच-सहा तास झोप ही विश्रांतीसाठी पुरेशी असते. इतर वेळी त्याने सतत काम करत राहावे. उगाचच बसून राहिल्याने अंगात आळस वाढतो. उलट प्रत्येकाने हे लक्षात ठेवले पाहिजे की, काळ हा सतत पुढे जात असतो. तो कोणाहीसाठी थांबत नसतो. आपण तो आळसात व्यर्थ दवडला तर आपला कार्यभाग राहणार नाही. सतत तेच काम करीत राहिल्यास कंटाळा येतो. म्हणून तर सहा दिवस काम केल्यावर रविवारी सुट्टी येते. त्या दिवशी आळसात लोळत पडण्यापेक्षा माणसाने छंदात रमून जावे.

**अ) खालील इंग्रजी शब्दांचे मराठी अर्थ उताऱ्यातून शोधून लिहा.**

१. Lazy - २. Sunday - ३. Hobby -

**आ)खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

१. आळशी माणूस कशाची अपेक्षा करत असतो?

२. विश्रांतीसाठी किती तासाची झोप पुरेशी असते?

३. खरा काम करणारा माणूस काय मानतो ?

## व्याकरण

**प्रश्न ७. खालील अंक अक्षरात लिहा.** **(३ गुण)**

१. ४५ - २. ४१ - ३. ५० -

**प्रश्न ८. अ)खालील वाक्यातील विशेषणे ओळखा व लिहा.** **(४ गुण)**

१. इमारत मोठी आहे. ३. औषध कडू आहे.

२. काही मुले वर्गात बसली. ४. बागेत लाल गुलाब आहे.

**आ)खालील विशेषणे वापरून वाक्य बनवा.** **(३ गुण)**

१. हुशार - २. प्रेमळ - ३. सुंदर -

## लेखन विभाग

**प्रश्न ९. खालील चित्राचे निरीक्षण करा आणि चित्राच्या आधारे कथा लिहा. कथेला योग्य शीर्षक द्या.** **(५ गुण)**



**किंवा**

**प्रश्न ९. वर्गशिक्षिकांस पत्र पाठवून चार दिवसांच्या सुट्टीसाठी परवानगी पत्र लिहा.** **(५ गुण)**

*******************************************